नि. फौ. मा. क्र. १८४९/२०२०

शासन –वि– कैलास + १

निशाणी क्रं. ०२

**<u>सरकार तर्फे सा. क्र.१ यांची साक्ष</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नांवः उमेश राधेशाम गुप्ता,

वयः ६१ वर्षे, धंदा– पानठेला,

रा. अमराईपुरा, यवतमाळ ता.व जि. यवतमाळ.

**<u>सरतपासणी श्रीमती एस. एस. कांबळे, सहा. सरकारी वकीलांमार्फत</u>**

दि. २६/०६/२०२० रोजी पोलीसांनी मला पंचनामा कामी कोठेही बोलाविले नव्हते. पोलीसांनी माझ्या समक्ष काहीही जप्त केले नाही. आता मला जप्ती पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही असून त्यातील मजकुर मला माहीत नाही. त्यास सही पुरता **<u>नि. क्र. ०३</u>** देण्यात येते.

**०२. साक्षीदार फितुर झाल्यामुळे सरकारी वकीलांनी कलम १५४ भारतीय पुरावा कायद्यानुसार त्याचा उलटतपास घेण्याची परवानगी मागितली. ती देण्यात आली.**

हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २६/०६/२०२० रोजी जप्ती पंचनामा कामी स्थानिक गुन्हे शाखा पोलीसांनी मला बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष कैलास पेंदोर कडून जुनी वापरती काळ्या रंगाची स्प्लेंडर प्लस मोटर सायकल अंदाजे कि. रुपये ५०,०००/– असलेली जप्त केली. हे म्हणणे खरे नाही की, हा पंचनामा माझ्या समक्ष तयार करण्यात आला व मी तो तयार करीत असताना तेथे समक्ष हजर होतो आणि म्हणून मी त्या पंचनाम्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, मी त्याला ओळखत असल्यामुळे मी त्याला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**०३. उलटतपास आरोपीतर्फे –** आरोपीविरुध्द जाहीरनामा काढल्यामुळे तो हजर होईपर्यत उलटतपास तहकुब.

वा. दा. ब. अ. क. के.

(श्रीमती अ. मो. शाह)
मुख्य न्यायदंडाधिकारी, यवतमाळ
दिनांक ०३/०६/२०२५.

माझे समक्ष

Digitally signed by ARCHANA MOHAN SHAH
Date: 2025.06.03 13:49:59 +0530

(श्रीमती अ. मो. शाह)
मुख्य न्यायदंडाधिकारी, यवतमाळ